# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### रेणापूर (जि.लातूर) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत झालेला गैरव्यवहार

**(१) ४९५३२ (०४-०५-२०१६). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रेणापूर (जि.लातूर) तालुक्यात सव्वा कोटी रुपयांचा नियम बाह्य खर्च करुन गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे काय,

(३) असल्यास, सदरील चौकशी अहवाल प्राप्त होऊन सुध्दा संबंधित दोषींवर अद्यापपर्यंत कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२०-०७-२०१७) :** (१) प्राथमिक चौकशी अहवालात तसे नमूद आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी अहवालाच्या आधारे दोषी आढळून आलेल्या वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांची संयुक्त विभागीय चौकशी करण्यासाठी प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ व दि.१७ ऑक्टोबर, २०१५ च्या पत्रान्वये सहायक आयुक्त (चौकशी), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यानुसार सहायक आयुक्त (चौकशी) यांनी वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होवू शकलेले नाहीत असा निष्कर्ष काढला होता. तथापि, या प्रकरणी वर्ग १ चे ४ अधिकारी व वर्ग ३ चे ७ कर्मचारी अपचारी असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) १९७९ मधील नियम १२ (१) नुसार संयुक्त विभागीय चौकशीची

कार्यवाही होणे आवश्यक असल्याने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा संयुक्त विभागीय चौकशीचा प्रस्ताव दि.८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी शासनास सादर केला आहे. तथापि सदर प्रस्तावात काही त्रुटी आढळून आल्याने परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील ग्रामरोजगार सेवकांचे मानधन देण्याबाबत**

**(२) ५६१३४ (११-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील निवडक ग्रामपंचायतीने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या ग्रामरोजगार सेवकांचे मानधन देण्याबाबत तहसील कार्यालयाकडून टाळाटाळ केली जात असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच तहसिल कार्यालयाने शासनाच्या परिपत्रकाचा आधार घेत हे मानधन पंचायत समितीने द्यावे असे पत्रान्वये कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार सदर ग्रामरोजगार सेवकांचे मानधन तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२०-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, मा.आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र यांचे परिपत्रक क्र. मग्रारोहयो/पंचायत/ग्रा.रो.से.मानधन/२०१५/१८९६, दि.१७.११.२०१५ यानुसार सदर प्रकरणी तहसिलदार मंगळवेढा यांनी, गट विकास अधिकारी, मंगळवेढा यांना ग्रामरोजगार सेवकांचे वेतन अदा करण्याबाबत कळविले होते.
(३), (४) व (५) सदर प्रकरणी गट विकास अधिकारी, मंगळवेढा यांनी दिनांक ३.८.२०१६ रोजी पंचायत समिती मार्फत सर्व ग्राम रोजगार सेवकांचे मानधन अदा केले आहे.

---

**दौंड (जि.पुणे) तालुक्यातील फुगवटा क्षेत्रातील गावांच्या हद्दीमध्ये बुडीत बंधारे बांधण्याबाबत**

**(३) ६२८५६ (२९-०८-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भीमा नदीवर उजनी धरण प्रकल्पातील पाण्याच्या फुगवट्यामध्ये दौंड (जि.पुणे) तालुक्यातील फुगवटा क्षेत्रातील गावांच्या हद्दीमध्ये बुडीत बंधारे बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. जलसंपदा मंत्री यांना माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवदेन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०७-२०१७) :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधींनी अशा प्रकारची कोणतीही मागणी या महामंडळांतर्गत असलेल्या संबंधित मुख्य अभियंता कार्यालयाकडे अथवा मंडळ कार्यालयाकडे थेटपणे केलेली नाही. तथापी अधीक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, पुणे यांचेकडे लोकप्रतिनिधींनी मागणी केलेबाबतचे पत्र लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर या कार्यालयास प्राप्त झाले आहे.
(२) जलसंधारण विभागामार्फत बुडीत बंधाऱ्याचे प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आलेबाबत अधीक्षक अभियंता, जलसंधारण यांनी त्यांच्या दि.६/९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर या कार्यालयास कळविलेले आहे.

उजनी प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प अहवालात जलाशयामध्ये बुडीत बंधारे बांधण्याची तरतूद नाही. तसेच बुडीत बंधारे बुडीत क्षेत्रात बांधल्यास त्याच्या परिचालनाच्याही समस्या निर्माण होतात असे अनुभवाअंती दिसून येते. उजनी जलाशयामध्ये बुडीत बंधारे बांधल्यामुळे उजनी प्रकल्पाचे पाणी नियोजनावर परिणाम होणार असल्यामुळे शासनाच्या ही बाब विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे पुनाडे (ता.उरण, जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या हद्दीत पुनाडे धरणाची झालेली दुरवस्था

**(४) ६५११९ (२७-०१-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पुनाडे (ता.उरण, जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या हद्दीत पुनाडे धरण असल्याने या धरणाचा कर मिळण्यासंदर्भात तसेच पुनाडे धरणाला गळती लागल्यामुळे दररोज कित्येक लिटर पाणी वाया जात असल्याने सदर ठिकाणी कॉक्रीट बंधारा बांधण्याची मागणी उपअभियंता, जलसंपदा उपविभाग, दहिलवली (ता. कर्जत) यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.
पुनाडे धरणास गळती असल्याने धरणाचे दुरुस्तीचे काम करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी व सदर धरण पुनाडे ग्रामपंचायतीच्या हद्दीत असल्याने धरणाचा कर मिळणेबाबत ग्रामपंचायतीने पत्राने विचारणा केली आहे.
(२) याबाबत धरणाची पाहणी क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी केली असता विमोचक विहीरीचे द्वार व विमोचक विहीरी मधून गळती असल्याचे आढळून आले आहे.
(३) धरणाचे विमोचक विहीर व विमोचक द्वार दुरुस्तीसाठी आवश्यक अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रिय कार्यालयात प्रगतीत आहे. धरणातील पाणी पातळी कमी झाल्यानंतर काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्हयातील अकोले (भंडारदरा) येथे बांधण्यात आलेल्या विश्रामगृहाची झालेली दुरवस्था

**(५) ६६५३७ (०५-०१-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील अकोले (भंडारदरा) येथे बांधण्यात आलेल्या कृष्णावंती विश्रामगृहाची मोठया प्रमाणात दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विश्रामगृहाची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर विश्रामगृहाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०७-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर विश्रामगृहाच्या दुरुस्तीचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय कर्मचाऱ्यांना DCPS योजनेंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था कर्मचाऱ्यांच्या रकमा लेखाशिर्षामध्ये जमा करण्याबाबत

**(६) ६६७६३ (०९-०१-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००५ नंतर भरती झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना सर्वसाधारण पेन्शन योजने ऐवजी DCPS योजनेंतर्गत पेन्शन योजना शासनाने सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेतंर्गत स्थानिक स्वराज्य संस्था कर्मचाऱ्यांच्या रकमा संबंधित लेखाशिर्षामध्ये जमा होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे. सन २००५ नंतर भरती झालेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सर्वसाधारण पेन्शन योजने ऐवजी, परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना शासनाने लागू केली आहे. ही योजना ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील स्थानिक स्वराज्य संस्थेमधील कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आली आहे. नगर विकास विभागाच्या अधिपत्याखालील नागरी स्वराज्य संस्थेतील कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू करण्यात आलेली नाही.
(२) अंशत: खरे आहे योजनेच्या सुरूवातीच्या काळात काही अंशी जिल्हा परिषदांकडून सदरच्या रकमा इतर लेखाशिर्षाखली जमा करण्यात आल्या आहेत परंतु आता कर्मचाऱ्यांचे अंशदान लेखाशिर्ष ८३४२५११६१ तर जिल्हा परिषदांचे सममुल्य अंशदान ८३४२५११०५ खाली जमा करण्यात येत आहे.
(३) या संदर्भात ग्रामविकास विभागाकडून सर्व जिल्हा परिषदांना या योजनेखाली भरणा झालेल्या सुरूवातीपासूनच्या रकमांचा त्यांच्या जिल्हा परिषदेशी संबंधित कोषागाराबरोबर ताळमेळ घेण्यास सांगितले. त्यामध्ये काही अंशी जमा रक्कमा योग्य लेखाशिर्षाखाली जमा न होता इतरेतर लेखाशिर्षाखाली जमा झाल्याचे आढळून आले आहे.
(४) योग्य लेखाशिर्षाखाली जमा न होता इतर लेखाशिर्षाखाली जमा झालेल्या रकमा योग्य लेखाशिर्षाखाली जमा होण्यासाठी संबंधित कोषागाराशी संपर्क करून योग्य ती कार्यवाही त्वरीत करावी अशा आशयाच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना ग्रामविकास विभागाकडून देण्यात आलेल्या आहेत व त्या प्रमाणे सर्व जिल्हा परिषदांकडून कार्यवाही सुरू असून ग्रामविकास विभागाकडून त्याबाबतचा वरचेवर आढावा घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भोर व वेल्हे (जि. पुणे) तालुक्यातील गुंजवणी नदीवरील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यासाठी नवीन बर्गे घेण्याबाबत

**(७) ६७५०७ (१६-१२-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील भोर व वेल्हे तालुक्यातील गुंजवणी नदीवरील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यासाठी नवीन बर्गे घेण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०७-२०१७) :** (१) होय.
(२) शासन निर्णय क्र. देवदु-२०१५/ (८३६/२०१५)/ सिं.व्य. (कामे) दि. १७/११/२०१६ नुसार पाणी वापराच्या अनुषंगाने जमा होणा-या पाणीपट्टी वसुलीच्या रक्कमा महामंडळाकडे जमा करण्यास व या रकमेतून प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदरचे काम पाणीपट्टीच्या रक्कमेतून हाती घेण्याचे नियोजीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालम (जि.परभणी) तालुक्यापर्यंत विष्णुपूरी धरणाचे व दिग्रज बंधा-याचे पाणी आल्यामुळे ५ गावातील विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(८) ७०५८३ (२७-०१-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील पालम तालुक्यापर्यंत विष्णुपूरी धरणाचे व दिग्रज बंधाऱ्याचे पाणी आल्यामुळे तालुक्यातील साधारण ५ गावातील १५० हून अधिक विद्यार्थ्यांना बोटीने सात वर्षापासून शाळेत जावे लागते आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील “क” वर्ग तिर्थक्षेत्रास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(९) ७१८२८ (२७-०१-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील “क” वर्ग तिर्थक्षेत्रास निधी उपलब्ध करुन देण्याचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ग्रामीण "क" वर्ग तीर्थक्षेत्रांना जिल्हास्तरावरुन जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध करुन दिला जात असल्याने, शासन नियम व निकषानुसार सदर प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीसमोर सादर करणेबाबत कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पिंपळनेर येथील लाटीपाडा धरणातील उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करण्याबाबत**

**(१०) ७२९२३ (२७-०१-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पिंपळनेर येथील लाटीपाडा धरण पूर्ण क्षमतेने भरले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धरणातील उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) होय.
दिनांक ०४/०८/२०१६ रोजी लाटीपाडा धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे.
(२) दिनांक ०४/०८/२०१६ रोजी धरण भरल्यानंतर वाहून जाणारे पुराचे पाणी कालव्याद्वारे सोडण्यात येऊन त्याद्वारे बेहेड ल.पा. तलावात पाणीसाठा केला आहे. दि.१५/१०/२०१६ रोजी धरणातील उपलब्ध उपयुक्त पाणीसाठा ३५.६३ दलघमी असून त्यापैकी पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षण, वहन व्यय व बाष्पीभवन व्यय वगळून उर्वरित २२.०९ दलघमी पाण्याचा वापर करण्याकरिता प्राथमिक सिंचन कार्यक्रम मंजूर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अक्कलपाडा (जि.धुळे) प्रकल्पातील उजव्या कालव्यात योग्य ठिकाणी विमोचन द्वार बसविण्याबाबत**

**(११) ७४५०० (१७-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अक्कलपाडा (जि.धुळे) प्रकल्पातील अतिरिक्त पाणी पांझरा नदीतून सोडले जाते, त्यावेळी उजव्या कालव्यातून काही नाल्यांमध्ये पाणी सोडले जाते मात्र चौगाव शिवारातील बोराटी नाला यापासून वंचित राहिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नाल्यात पाणी सोडण्यासाठी उजव्या कालव्यात योग्य ठिकाणी विमोचक द्वार बसविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी यांना दिनांक १६ नोव्हेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र देऊनही अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर विमोचक द्वार बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, धुळे मध्यम प्रकल्प विभाग, धुळे यांना दि.१६ नोव्हेंबर, २०१६ रोजी लेखी पत्र दिलेले असून त्याची प्रत संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालयास दिलेली आहे. मागणी नुसार सय्यदनगर कालव्यावर बोराटीनाल्यावर अतिवाहक (Escape) बांधकामाचा प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. प्रस्तावास सक्षम स्तरावरून मान्यता प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिलारी (जि.सिंधुदुर्ग) प्रकल्पातील कामात झालेला गैरव्यवहार

**(१२) ७५३८२ (१८-०४-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिलारी (जि.सिंधुदुर्ग) प्रकल्पातील कालव्याची कामे, रिंगरोड मधील झालेला गैरव्यवहार, शिरंगे बुडीच्या क्षेत्रामध्ये सुरू असलेले दगड खाणी सुरूंग स्फोटामुळे धरणाला बसणारे हादरे आदीबाबत मागील ३ वर्षापासून सातत्याने मा.मुख्यमंत्री, मा.जलसंपदामंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, कार्यकारी अभियंता, तिलारी प्रकल्प आदीकडे तेथील ग्रामस्थांनी लेखी निवेदने सादर केलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयनोडे रिंगरोड, मांगेली, शिरंगे, पाटये, केंद्रे, रिंगरोड ही कामे अद्यापी पूर्ण झालेली नसून शिरंगे धरण क्षेत्रात होत असलेले सुरूंग स्फोट बेकायदा उत्खनन, तिलारीचा गैरकारभार आदीबाबत सातत्याने तेथील ग्रामस्थांनी तक्रारी करूनही आतापर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने विनाविलंब चौकशी होवून कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) सिंधुदुर्ग जिल्हयातील तिलारी प्रकल्पातील कालव्याची कामे, रिंगरोडची कामे यामध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

शिरंगे बुडीत क्षेत्रामध्ये सुरु असलेले दगड खाणी बंद करण्याबाबत ग्रामस्थांकडून तसेच राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून क्षेत्रीय कार्यालयास निवेदने प्राप्त झालेली आहेत.

(२) धरणाचे बुडीत क्षेत्रातील उजव्या तिरावरील आयनोडे व सरगवे येथील रिंगरोडची कामे प्रगतीपथावर आहेत व रिंगरोड हा सरगवे गावामध्ये येतो. तसेच डाव्या तिरावरील रिंगरोड (मांगेली देवुळवाडी-शिरंगे-पाटये-पाल गावात) करण्याचे प्रस्तावित असून सदरहू कामे प्रगतीपथावर आहेत.

शिरंगे धरण क्षेत्रात सुरुंग स्फोट, बेकायदा उत्खनन बंद करण्याबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या समन्वयाने कार्यवाही होवून सदर खाणी मार्च २०१५ पासून बंद करण्यात आल्याबाबत तहसिलदार, दोडामार्ग यांनी क्षेत्रिय कार्यालयास कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील नामपाडा-कुतरकुंड लघुपाटबंधारे प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१३) ७५६८४ (१५-०४-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील कुतरकुंड लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या कामास ११ वर्षापुर्वी सुरुवात झाली असून सदर प्रकल्पाचे काम अद्यापपर्यंत अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर प्रकल्पाचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०७-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्पाचे काम फेब्रुवारी, २०१० पासून सुरू झाले आहे. वन प्रस्तावास तत्वत: मान्यता मिळाली असून अंतिम मान्यता न मिळाल्याने एप्रिल, २०१२ पासून काम बंद आहे.

(२) वन प्रस्तावास अंतिम मान्यता अद्याप पर्यंत न मिळाल्याने तसेच सुधारित प्रशासकीय मान्यता नसल्याने काम बंद आहे. त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाड (जि.रायगड) तालुक्यातील कोतुर्डे धरणाची झालेली दुरवस्था

**(१४) ७६३५७ (१७-०४-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील किल्ले रायगडजवळच असलेल्या कोतुर्डे धरणाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असल्यामुळे २२ ग्रामपंचायतींची तसेच महाड शहराची नळपाणी पुरवठा योजना धोक्यात आली असून चार गावांतील नळपाणी योजना बंद झाली असल्याचे माहे डिसेंबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाची पाहणी केली आहे काय व पाहणीवरुन कोतुर्डे धरणाची नव्याने दुरुस्ती करुन महाड शहरामधील दासगाव, वहूर, केंबुर्ली, गांधरपाले, करंजखोल या गावांमध्ये पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

सदर धरणाच्या विमोचकाच्या पाईपलाईनच्या वरील बाजूस सरळ रेषेमध्ये धरणाच्या खालील बाजूस पाण्याचा पाझर जूलै २०१४ च्या दरम्यान दिसून आला असता, त्यावेळी तात्काळ तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली होती. त्यानंतर मे २०१६ मध्ये याची तातडीने दुरुस्ती करुन धरणातून येणारा पाण्याचा पाझर थांबविण्यात आला आहे. त्यामुळे धरणातून कोणत्याही प्रकारे पाणी वाया जात नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत नळ पाणी पुरवठा सुरळीत चालू आहे.

(२) धरणाची दुरुस्ती मे २०१६ मध्येच करण्यात आली असून स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत नळ पाणी पुरवठा चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेतंर्गत विहिरींची कामे अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(१५) ७६८६३ (१५-०४-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील तालुका निहाय पंचायती समित्यांमार्फत एमआरईजीएस (रोजगार हमी योजना) अंतर्गत सन २०१५-१६ साठी किती विहिरींचे उद्दीष्ट पूर्ण करण्याचे आदेश शासनाने पंचायत समित्यांना दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती विहीरींची कामे पूर्ण झाली आहेत व किती विहीरींचे काम अपुर्णावस्थेत आहेत,

(३) असल्यास, सदर विहीरींची कामे दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजीपर्यंत न होण्याची कारणे काय आहेत व याप्रकरणी लाभार्थ्यांना वंचीत ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०७-२०१७) :** (१) जळगांव जिल्हयासाठी रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०१५-१६ साठी एकूण ८१२ विहिरींचे उद्दीष्ट पुर्ण करण्याचे आदेश सर्व पंचायत समिती यांना देण्यात आले होते.
(२) दिलेल्या उद्दीष्टापेक्षा जास्त म्हणजेच एकूण १२३८ विहिरी पुर्ण करण्यात आल्या आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण (जि.सातारा) तालुक्यातील तारळी धरणाला नवीन द्वार बसविण्याबाबत**

**(१६) ७७१४२ (१५-०४-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यातील तारळी धरणाचे द्वार दिनांक ५ व ६ जानेवारी च्या दरम्यान तुटल्यामुळे १ हजार क्युसेकपेक्षा जास्त पाण्याचा विसर्ग झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार सदर धरणाचे नवीन द्वार बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१)दि.०६/०१/२०१७ रोजी सकाळी १०.३० वा.पासून तारळी धरणाच्या सिंचन तथा विद्युत विमोचकाच्या शीघ्र गतीने बंद होणा-या (Quick Closing Gate) द्वाराकडे जाणा-या गॅलरीमधून अंदाजे ३०० घनफुट प्रती सेकंद इतका विसर्ग येत असल्याचे निदर्शनास आले.
(२) व (३) त्यानुसार त्याच दिवशी उर्ध्व बाजूचे आपत्कालीन द्वार (Emergency Gate/ Stop Log Gate) रात्री ११.३० वाजता यशस्वीरीत्या बंद करून उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण आणण्यात आले.

Quick closing gate, Bonet & amp; Hoist arrangement इत्यादी घटकांच्या दुरुस्तीची कार्यवाही यांत्रिकी विभाग व स्थापत्य विभागामार्फत समन्वयाने हाती घेऊन या द्वाराची उभारणी पूर्ण करण्यात आली असून दि. २७/३/२०१७ पासून धरणातून सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे अंबाड व मौजे शिराळ(मा.) (ता.माढा, जि.सोलापूर) या गावांचा सिना-माढा उपसा सिंचन योजनेत समावेश असूनही त्यांना सिंचनाचा लाभ न मिळाल्याबाबत**

**(१७) ७७८०२ (१८-०४-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील सिना-माढा उपसा सिंचन योजना ही एकुण १६१५१ हेक्टर क्षेत्र सिंचन निर्मीती करण्याचे उदिष्ट असणारी योजना असून या योजनेमध्ये माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील मौजे अंबाड व मौजे शिराळ(मा.) या गावांचा समावेश असूनही आजतागायत दोन्ही गावे सिंचनाखाली आलेली नाहीत, याबाबत मुख्य कालवा कि.मी.७ मधून सर्व्हे करून सिंचनाचा लाभ देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच सुधारीत प्रशासकीस मान्यता मंजुरी अद्यापर्यंत न मिळाल्याने योजनेची कामे होण्यासाठी विलंब लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सुधारीत प्रशासकीस मान्यता मंजुरी तातडीने देऊन वंचित राहिलेल्या भागास निधी उपलब्ध करून सिंचन निर्मीती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१) होय.

सीना माढा उपसा सिंचन योजनेच्या प्रकल्प अहवालातील मंजूर लाभक्षेत्रात अंबड व शिराळ (माढा) या गावांचा समावेश असून अनुक्रमे २४.९२ हेक्टर व ४८.४५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे प्रस्तावित आहे. डाव्या कालव्याच्या कि.मी. क्र.१३/६४० ते कि.मी.१४/५४० या लांबीत शेतकऱ्यांचा विरोध असल्याने कालवा खोदाईचे काम झाले नसल्याने सद्य:स्थितीत अंबड गावचे २४.९२ हेक्टर क्षेत्रापैकी सिंचनाखाली आलेले क्षेत्र "निरंक" आहे.

मौजे शिराळ (मा.) या गावाचे प्रकल्पीय अहवालानुसार सिंचनाखाली पीक क्षेत्र ४८.४५ हे. आहे. सदर क्षेत्र डाव्या कालव्यावरुन सिंचनाखाली आले आहे.

या बाबत मुख्य कालवा कि.मी.७ मधून सिंचनाचा लाभ देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीकडून आलेली नाही.

(२) सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टिटवाळा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील काळू नदीवर बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यातून पाण्याची गळती होत असल्याबाबत**

**(१८) ७८०४३ (१५-०४-२०१७). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टिटवाळा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील काळू नदीवर बांधण्यात आलेल्या बंधाऱ्याला गळती लागल्याने बंधाऱ्यातून दररोज लाखो लीटर पाणी वाया जात असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत मागील २ वर्षापासून पाठपूरावा सुरु असूनही लघु पाटबंधारे विभागाने अद्यापही दुरुस्ती केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार नदीवरील बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०७-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही. माहे मे, २०१५ मध्ये लोखंडी बर्गे काढल्यानंतर गळती प्रतिबंधक उपाय म्हणून काही प्रस्तंभांची दुरूस्ती करण्यात आली आहे.
(३), (४), (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

टिटवाळा को. प. बंधारा हा सन १९८४ मध्ये पूर्ण झाला असून बंधाऱ्याच्या लोखंडी बर्ग्यांमधून गळती होत असल्यामुळे बंधाऱ्यासाठी नविन बर्गे बसविणे व बंधाऱ्याचे मजबुतीकरण व दुरूस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रियस्तरावर प्रगतीपथावर आहे. सदर अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाल्यावर निधी उपलब्धतेनुसार काम हाती घेण्यात येईल.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा डाव्या कालव्यासह**
**सिंचनाच्या अनेक योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(१९) ७८१२४ (१७-०४-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा डाव्या कालव्यासह धरणाचे काम होऊनही सिंचनाच्या अनेक वर्ष योजना प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,तद्नुसार भातसा डाव्या कालव्यासह अनेक प्रलंबित असलेल्या सिंचन योजनांची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) शहापूर तालुक्यातील भातसा व नामपाडा या दोन बांधकामाधीन योजना आहेत. तसेच भातसा डावा तीर कालवा व भातसा उजवा तीर कालव्यासाठीच्या एकूण २६९.४५४ हे. वनक्षेत्रासाठी dweller's act certificate जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेले आहे. सदर प्रमाणपत्र वन विभागास दिनांक १/७/२०१५ रोजी सादर केले असून, Chief Conservative of Forest यांनी वनजमीनीस अंतिम मान्यतेसाठीचा प्रस्ताव दिनांक ०८/१०/२०१५ रोजी केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर केलेला आहे. वन खात्याकडून अंतिम मान्यता प्राप्त होताच भातसा डावा तीर कालव्यावरील कामे सुरु करणे शक्य होईल व डाव्या कालव्यावरील नियोजित ६३२० हे. सिंचन क्षेत्र निर्मित करणे शक्य होईल.

नामपाडा योजना वन प्रस्तावास दिनांक १३/०५/२००८ रोजी तत्वत: मान्यता मिळालेली आहे. अंतिम मान्यता अद्याप प्राप्त नाही. सदर प्रकल्पाचे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील धरणग्रस्तांना जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(२०) ७८३४८ (१५-०४-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील शहरासह गावपाडयांना वर्षभर पाणी पिण्यासाठी लघु पाटबंधारे खात्याच्या सविस्तर विभागाकडून सन १९९४-९५ मध्ये पळसपाडयाजवळ वाघ नदीवर करोडो रुपये खर्च करुन मोठे धरण बांधण्यात आले असून त्यांचा कुठलाही फायदा गावातील लोकांना झाला नसून ज्या शेतक-यांच्या जमिनी धरणाखाली गेल्या आहेत त्यांनाही त्याचा मोबदला आजपर्यंत मिळालेला नाही तसेच नगरपंचायतीच्या गावपाड्याना पिण्याच्या पाण्याचा अनियमित व अपुरा पाणीपुरवठा होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच शहरापासून ४ ते ५ कि.मी. च्या अंतरावर या धरणाच्या पाटाला गळती लागल्यामुळे तेथील शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असून प्रकल्प अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोखाडा शहरवासीय व आसपासच्या गावपाड्यांना नियमितपणे पाणीपुरवठा करण्यासह शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०७-२०१७) :** (१) नाही.

ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी धरणाखाली गेल्या आहेत, त्यांना पूर्ण मोबदला अदा केला असून कालव्यासाठी संपादित केलेल्या जमिनी थेट वाटाघाटीने खरेदी करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

धरणामधील एकूण पाणीसाठयापैकी ०.१७३ द.ल.घ.मी. पाणीसाठा पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षीत असून सद्य:स्थितीत पिण्याच्या पाण्याची मागणी करण्यात आलेली नाही. भविष्यात पिण्याच्या पाण्यासाठी मागणी आल्यास पाणी आरक्षण मंजूर करण्यात येईल.

(२) नाही.

मुख्य विमोचकातून येणाऱ्या पाण्यामुळे या भागात ओलावा दिसून येत आहे. या धरणाचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. डाव्या कालव्याचे काम १०० टक्के व उजव्या कालव्याचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे.

(३) ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी धरणाखाली गेल्या आहेत, त्यांना पूर्ण मोबदला अदा केला असून कालव्यासाठी संपादित केलेल्या जमिनी थेट वाटाघाटीने खरेदी करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील तिलारी प्रकल्प येथे उभारण्यात आलेल्या शासकीय निवासस्थानाची झालेली दुरवस्था

**(२१) ७८६९२ (२०-०४-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील तिलारी प्रकल्प येथील शासकीय निवासस्थानाची मोठया प्रमाणात दुरवस्था झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवासस्थानाची पाहणी केली आहे काय व पहाणीवरुन निवासस्थानाची दुरुस्ती तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) सदर वसाहत वन जमिन क्षेत्रात स्थित असून वसाहत बांधून ४२ वर्षे इतका कालावधी झालेला आहे. मूळ तिलारी जलविद्युत प्रकल्पाचे काम देखील पूर्ण झाले असून, १९८७ पासून वीज निर्मिती करण्यात येत आहे. प्रकल्प महानिर्मिती कंपनीकडे हस्तांतरीत झाला आहे. सद्य:स्थितीत वसाहत वापरांत नाही. तसेच हा परिसर अतिपर्जन्य वृष्टीचा असल्यामुळे निवासस्थानांची बऱ्याच प्रमाणात पडझड झालेली आहे.

(२) सदर निवासस्थानांची उपविभागीय अधिकारी, तिलारी मुख्य धरण उपविभाग, तिलारीनगर यांनी पहाणी केलेली आहे. वसाहतीमधील काही भागात कर्मचाऱ्यांचे वास्तव्य असून त्याची नियमितपणे दुरुस्ती करण्यात येत असते.

सदर निवासस्थाने व वसाहतीची असलेली जमिन ही पूर्णपणे वनखात्याच्या मालकीची असून प्रकल्पाच्या कामासाठी ९९९ वर्षांच्या कराराने वनखात्याकडून जलसंपदा विभागाने घेतलेली आहे.

सद्य:स्थितीत तिलारी जल विदयुत प्रकल्प व त्याची सर्व अनुषंगीक कामे पूर्ण झालेली असून, जलसंपदा विभागास कर्मचाऱ्यांचे वास्तव्य असलेली जमिन वगळता उर्वरित जमिनीची आवश्यकता नाही. त्यामुळे वन खात्यास सदर जमिन परत करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पातील पुणेगाव दरसवाडी-डोंगरगाव पोहोच कालव्याचे बंद पडलेले काम सुरु करणेबाबत

**(२२) ७९००० (२०-०४-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पातील पुणेगाव दरसवाडी-डोंगरगाव पोहोच कालव्याचे बंद पडलेले काम सुरु करुन काम पूर्ण करण्यासाठी १४० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१) होय.

(२) पुणेगाव कालवा व दरसवाडी पोहोच कालवा हे कालवे ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पाचा भाग आहेत. सन २०१७-१८ मध्ये ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पासाठी रुपये ३८.३४८ कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतुद केलेली आहे. मात्र, प्रकल्पावर अद्ययावत सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीपेक्षा अधिक खर्च झाला आहे. प्रकल्पाच्या सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिह्यातील विविध सिंचन प्रकल्पांना मंजूरी देऊन निधी देण्याबाबत

**(२३) ७९०८७ (१५-०४-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरी तसेच आमगांव (जि.गोंदिया) येथील जलसंपदा विभागाअंतर्गत कुढावास नाला प्रकल्पांना व विविध प्रकल्पांना मंजूरी देऊन निधी मिळण्याबाबत मंत्रालयीन पातळीवर बैठकीचे आयोजन करण्यात येऊन सदरची योजना गेल्या दोन वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा तसेच मा. जलसंपदा मंत्री यांना लेखी निवेदन देऊनही शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सिंचन प्रकल्पांना निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) नाही, कुढावास नाला प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल अद्याप राज्य तांत्रिक सल्लगार समितीस सादर झालेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव ख. (जि.अमरावती) तालुक्यातील बेंबळा प्रकल्पांतर्गत धामक या पुर्नवसित गावातील नदीवरील पुलाला सरंक्षक कठडे बसविण्याबाबत**

**(२४) ७९१६४ (१५-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव ख. (जि.अमरावती) तालुक्यातील बेंबळा प्रकल्पांतर्गत धामक या पुर्नवसित गावातील नदीवरील पुलाचे सरंक्षक कठडे गेल्या दोन वर्षापासुन नसल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) नसल्यास, पुलाचे सरंक्षक कठडे बसविण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधीत प्रकल्प विभागाच्या अधिकारींवर कारवाई करण्याबाबत व पुलाचे सरंक्षण कठडे तातडीने बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०७-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे. गावातील नदीवरील पुलाचे काही संरक्षक कवडे (railing) तुटलेले आहे.
(२) याबाबत क्षेत्रीय स्तरावर पाहणी केलेली असून अज्ञात व्यक्तींनी railing चे पाइप चोरून नेल्याचे निदर्शनास आले. त्याबाबत सरपंच, ग्रामपंचायत धामक यांनी पोलीस स्टेशन तळेगाव येथे तक्रार दाखल केली आहे.
(३) संबंधित कामाचा करारनामा अंतिम झाला नसल्याने संबंधित कंत्राटदाराकडून पुलाचे संरक्षण कवडे दुरूस्तीची कार्यवाही करून घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुर्णा (जि.परभणी) तालुक्यातील निळा शिवारात पूर्णा नदीवर उभारण्यात येणाऱ्या कोल्हापूरी बंधाऱ्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२५) ७९२८८ (१७-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्णा (जि.परभणी) तालुक्यातील निळा शिवारात पूर्णा नदीवर उभारण्यात येणाऱ्या कोल्हापूरी बंधाऱ्याचे काम गत चार वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू काम हे तांत्रिक अडचणी व कंत्राटदाराचे आतापर्यंत केलेल्या कामाचे देयक देण्यासाठी लागणाऱ्या निधीअभावी काम अपूर्णावस्थेत असल्याचे लघु पाटबंधारे विभागाच्या उपकार्यकारी अभियंता यांनी पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बंधाऱ्यांचे काम तातडीने सुरु करण्याबाबत ग्रामस्थांनी पाटबंधारे विभागाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

सदर काम मे, २०१५ पासून निधी अभावी बंद आहे.

(३) दिनांक ०१.०४.२०१६ रोजी ॲड. शिवप्रसाद सोनी, माजी जिल्हा अध्यक्ष भाजपा परभणी व ॲड. एस.जी.मोहिते यांनी सदर काम पूर्ण करणेसंदर्भात मा.मुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य यांना मागणी केली आहे.

(४) सदर योजनेच्या सु.प्र.मा. प्रस्तावास दिनांक १९.०३.२०१६ रोजी मान्यता देण्यात आली असून निधी उपलब्धतेसाठी सदर प्रकल्पाचा अविशिष्ट प्रकल्पांच्या यादीत समावेश केला आहे. निधी उपलब्धतेनुसार उर्वरित कामे करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत विकास कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२६) ७९३०६ (१५-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत १ लाख ४५ हजार ४९९ इतकी विकास कामे अदयापही अपूर्णावस्थेत असल्याबाबतची माहिती केंद्रीय संयुक्त सचिवांनी शासनाला माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजनेअंतर्गत प्रगतीपथावर असलेली कामेसुध्दा अत्यंत धिम्यागतीने पूर्णात्वास अधिकारी वर्ग नेत असून विविध विकास कामे पूर्ण करण्याबाबत देण्यात आलेली उद्दिष्टे पूर्ण करण्यात माहे डिसेंबर, २०१६ अखेरपर्यंत राज्य शासन अपयशी ठरले असेही अहवालात नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त कामे निधी असून अपूर्णावस्थेत असण्याची कारणे काय आहेत व यासंदर्भात चौकशी करुन या कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यासह अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) दि.२४/३/२०१७ रोजी मा.संयुक्त सचिव, ग्रामविकास मंत्रालय,नवी दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीमध्ये दि.३१ मार्च २०१६ पर्यंत सुरु होऊन अपुर्ण असलेली एकुण २,५१,०६७ कामे दि.३१/७/२०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच दि.३१/०३/२०१७ पर्यंतची सर्व अपूर्ण कामे दि.३१/१२/२०१७ पर्यंत पुर्ण करण्याबाबत निर्देश आहेत.
अपूर्ण कामांची सद्यस्थिती पुढील प्रमाणे आहे :-

| वर्ष | घेतलेली कामे | पूर्ण झालेली कामे | टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | ७२९१४४ | ६१६३८३ | ८४.५४ |
| २०१५-१६ | २०८९६२ | ७०६५६ | ३३.८१ |
| २०१६-१७ | २२१८०५ | १७२९९ | ७.८ |
| २०१७-१८ (१६.५.२०१७ पर्यंत) | २१५८८ | १ | - |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महापालिकामध्ये स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द केल्यामुळे राज्य शासनाने केंद्र शासनाकडे अर्थसहाय्य करण्याची केलेली मागणी**

**(२७) ७९३१७ (१९-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महापालिकामध्ये स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द केल्यामुळे शासनाने केंद्र शासनाकडे ३ हजार २९० कोटी रुपयांचे अर्थसहाय्य करण्याची मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०७-२०१७) :** (१) वस्तू व सेवा कर प्रणालीच्या अवलंबनानंतर केंद्रामार्फत देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईची रक्कम परिगणीत करताना, राज्य शासनाचा वर्ष २०१५-१६ चा महसूल आधारभूत ठरविण्यात येणार आहे. सदर आधारभूत वर्षाच्या महसूलामध्ये स्थानिक संस्था कर रद्द केल्यामुळे महानगरपालिकांना दिलेल्या रुपये ३ हजार २९० कोटी अनुदान मोजण्यात यावे अशी मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे डिसेंबर, २०१६ मध्ये केली आहे.

(२) राज्य शासनाने या संदर्भात मागणी केंद्र शासनाच्या वित्त विभागाकडे केली आहे.

(३) लागू नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील दहीगांव उपसा सिंचन योजनेमध्ये शेतकऱ्यांना नवीन भूसंपादन कायद्यानुसार मोबदला देण्याबाबत**

**(२८) ७९५३२ (१५-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील दहीगांव उपसा सिंचन योजनेमध्ये टप्पा क्र.१ व टप्पा क्र.२ मधील संपादित क्षेत्राच्या ९० टक्के शेतक-यांना नवीन भूसंपादन कायद्यानुसार मोबदला मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित केल्या त्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीचा पूर्ण मोबदला अद्यापही मिळालेला नसल्याने जमीनीचा मोबदला न मिळालेल्या शेतकऱ्यांनी सदर प्रकल्पाच्या कामास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१) होय.

(२) नाही.

प्रकल्पाचे काम सुरू करण्यापूर्वी जमीन मालकांची लेखी संमती घेऊन काम प्रत्यक्षात सुरू करण्यात आले आहे. सदर भूसंपादन प्रस्तावाबाबतची सद्यस्थिती वेळोवेळी शेतकऱ्यांशी संपर्कात राहून अवगत करण्यात येत असल्यामुळे तुरळक अपवाद वगळता शेतकऱ्यांकडून प्रकल्पाच्या कामात विरोध झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) • सन १९९८-९९ मध्ये महसूल विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आले होते तथापि सन २००८-०९ पर्यंत या योजनेस निधी उपलब्ध झाला नाही. सबब कालापव्यय झाल्याने प्रकरणे व्यपगत झालेली होती.

• तद्नंतर सन २००८ मध्ये भूसंपादनाच्या मोबदल्याची २/३ इतकी रक्कम रु. ५६.६६ लक्ष निधी दि. १२/०३/२००८ रोजी महसूल विभागाच्या मागणीनुसार वर्ग करण्यात आला होता.
• महसूल विभागाकडून ५ प्रकरणांचा अंतिम निवाडा जुना भूसंपादन कायदा १८९४ नुसार झालेला आहे. उर्वरित प्रकरणांच्या कार्यवाही दरम्यान नवीन भूसंपादन कायदा २०१३ अस्तित्वात आल्याने सदरची सर्व भूसंपादन प्रकरणे व्यपगत करण्यात येऊन नवीन कायद्याप्रमाणे सादर करण्यासाठी सन २०१५ मध्ये प्रकरणे परत करण्यात आली आहेत. नवीन कायद्यानुसार भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील सीना-कोळगाव प्रकल्पाच्या शेतकऱ्यांना त्याचा जमीनीचा मोबदला मिळाला नसल्याबाबत**

**(२९) ७९५३६ (१५-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील सीना-कोळगाव प्रकल्पाचे मुख्य कालवा, शाखा कालवा, वितरिकांची कामे १०० टक्के पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच उक्त प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित केल्या त्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीचा पूर्ण मोबदला अद्यापही मिळालेला नसल्याने जमीनीचा मोबदला न मिळालेल्या शेतकऱ्यांनी सदर प्रकल्पाच्या कामास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१) सीना कोळगाव प्रकल्पांतर्गत करमाळा उपसा सिंचन योजना दि. ५/१/२०१७ रोजी कार्यान्वित झाली आहे. वितरिका व लघु वितरिकांची ९०% कामे पूर्ण झाली आहेत. वितरिका, लघु वितरिकांची १०% कामे भूसंपादना अभावी अपूर्ण आहेत.
(२) होय.
(३) व (४) कालव्यासाठी संपादित केलेल्या जमीनीचा मोबदला देणे बाबत नवीन भूसंपादन अधिनियमानुसार कार्यवाही प्रगती पथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील सीना-कोळगाव प्रकल्पांतर्गत वितरीका व लघु वितरीकांची कामे अपूणावस्थेत असल्याबाबत**

**(३०) ७९५३७ (१७-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील सीना-कोळगाव प्रकल्पांतर्गत ३५३६ हेक्टर लाभ क्षेत्रापैकी किती हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे,
(२) असल्यास, उर्वरित वितरीका व लघु वितरीकांची कामे पूर्ण झाली आहेत काय व त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१) सीना कोळगाव प्रकल्पांतर्गत करमाळा उपसा सिंचन योजनेची प्रकल्पीय सिंचन क्षमता ३५३६ हे. इतकी आहे. त्यापैकी जून २०१६ अखेर ३१०० हे. इतक्या सिंचन क्षेत्राची निर्मिती झाली आहे.
(२) वितरिका व लघुवितरिकाची ९०% कामे पुर्ण झाली असून उर्वरित १०% कामासाठी रु.४.८५ कोटी निधी उपलब्ध आहे.
(३) सिना कोळेगाव प्रकल्पाच्या कालव्याकरीता भूसंपादनाची कार्यवाही प्रलंबित असल्यामुळे वितरिका व लघु वितरिकांच्या कामास विलंब होत आहे.

---

## राज्य शासनाने सर्व प्रकारच्या अनुत्पादित तंबाखूवर साडेतेरा टक्के मूल्यवर्धित कर प्रस्तावित केल्याबाबत

**(३१) ८०१०३ (१९-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने सर्व प्रकारच्या अनुत्पादित तंबाखूवर साडेतेरा टक्के मूल्यवर्धित कर प्रस्तावित केला असून सदर मूल्यवर्धित करामुळे कोल्हापूर जिल्हयातील जयसिंगपूर येथील तंबाखू व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर असल्यामुळे कामगार बेरोजगार होणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०७-२०१७) :** (१) कोल्हापूर विभागात २०१२ मध्ये मूल्यवर्धित कर कायद्यांतर्गत अनुत्पादित तंबाखूचे ६७ नोंदीत व्यापारी होते. त्यातील काही व्यापाऱ्यांचा नोंदणी दाखला रद्द झालेला असून एप्रिल २०१६ मध्ये ६० व्यापारी नोंदणीकृत आहेत. त्यानुसार या कालावधीत १० टक्के नोंदणी दाखल रद्द झालेले दिसून येतात.

तसेच या व्यापाऱ्यांची वार्षिक उलाढाल २०१२-१३ या वर्षात ७४.७२ कोटी इतकी होती तर २०१६-१७ मध्ये ती ८७.४६ कोटी इतकी आहे.

यावरुन असे दिसून येते की, नोंदणीकृत व्यापाऱ्यांच्या संख्येत जरी १० टक्के ने घट झालेली असली तरी अनुउत्पादीत तंबाखूची विक्री उलाढाल कमी झालेली दिसत नाही. त्यामुळे सदर व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर आहे, हे विधान खरे वाटत नाही व कामगार बेरोजगार होतील अशी शक्यता वाटत नाही.

(२) लागू नाही.
(३) शेजारील राज्यात अनुत्पादित तंबाखू वरील कर माफ असल्यामुळे राज्यातील व्यापाऱ्यांना व्यापारासाठी समान संधी मिळण्यासाठी अनुत्पादित तंबाखूच्या आंतरराज्यीय विक्रीवर दि.१ ऑगस्ट, २०१४ रोजी संपूर्ण कर माफ करण्यात आलेला आहे.
(४) लागू नाही.

---

**आटपाडी (जि.सांगली) शहरातील धांडोर ओढ्यात निंबवडे तलावातून टेंभूचे पाणी सोडणेबाबत**

**(३२) ८१०३९ (१७-०४-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आटपाडी (जि.सांगली) शहरातील धांडोर ओढ्यात निंबवडे तलावातून टेंभूचे पाणी सोडणेची मागणी मापटेमळा, आटपाडी व पुजारवाडी येथील ग्रामस्थांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली होती त्यावेळी मा.जलसंपदा राज्यमंत्री यांनी तांत्रिक विभाग, पाटबंधारे विभाग व टेंभूच्या अधिकाऱ्यांसमवेत पाहणी करण्याचे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागाचा संबंधीत विभागाने सर्वे केला आहे काय,
(३) असल्यास, सर्वेनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१) श्री. अनिल बाबर, वि.स.स. यांनी त्यांचे दि. २०/१२/२०१६ चे पत्रान्वये अशा प्रकारची मागणी केली होती व सदर मागणीचे अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावरुन प्राथमिक पाहणी करणेबाबत सूचना दिल्या होत्या.
(२) आमदार महोदय यांचे उपस्थितीत संबंधीत कार्यकारी अभियंता, उप विभागीय अधिकारी व लाभधारक यांचे समवेत दि. २/१/२०१७ रोजी क्षेत्रिय पाहणी करण्यात आली आहे.
(३) पाहणी अंती उपरोक्त क्षेत्र हे टेंभू उपसा सिंचन योजनेच्या आटपाडी डाव्या कालव्याचे निंबवडे वितरिके अंतर्गत समाविष्ट असल्याने सदर वितरीकेचे काम सत्वर करणेबाबत कार्यवाही करावी असे चर्चेअंती ठरले व त्यानुसार सविस्तर सर्वेक्षण व अंदाजपत्रकाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापुर जिल्हयातील काळम्मावाडी धरणाच्या गैबी कालव्यातून पाणी सोडण्यात आल्यामुळे शेत जमीनीसह शेतीचे नुकसान झाल्याबाबत**

**(३३) ८११९९ (१५-०४-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्ह्यातील काळम्मावाडी धरणाच्या गैबी कालव्यातून अचानक पाणी सोडण्यात आल्यामुळे शेत जमीनीचे व शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याची घटना दिनांक ९ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेत १० गुंठे शेत जमीन वाहून जावून ऊस शेती व फळ झाडे तुटून पडली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०७-२०१७) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खुंटेफळ (ता.आष्टी, जि.बीड) येथील कृष्णा खोरे अंतर्गत साठवण तलावाचे काम बंद असल्याबाबत

**(३४) *८१४१५* (२०-०४-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुंटेफळ (जि. बीड) येथील कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्र. ३ अंतर्गत साठवण तलावाचे काम दिनांक ३१ डिसेंबर,२०१३ रोजी पासून पर्यावरण मान्यतेसाठी बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तलावाच्या कामासाठी पर्यावरण मान्यता मिळण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे व सदरहू तलावाच्या कामास पर्यावरण मान्यता मिळण्यासाठी किती कालावधी लागणार आहे,
(३) असल्यास, सदर तलावाच्या कामासाठी पर्यावरण मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यता येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पास दिनांक २४/६/२०१५ रोजी केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल विभाग, दिल्ली यांच्याकडून पर्यावरण मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर मान्यतेमध्ये आष्टी उपसा सिंचन योजना क्र.३, जिल्हा बीड या योजनेचा अंतर्भाव नसल्याचे निदर्शनास आल्याने त्यानुसार सदर योजनेस TOR मिळण्याबाबतचा प्रस्ताव

दिनांक २/७/२०१५ रोजी सादर करण्यात आला होता. त्यानुसार दिनांक १०/१२/२०१५ अन्वये या योजनेस Environmental Impact Assessment (ETA) व Environmental Management Plan (EMP) संदर्भातील अभ्यास करण्यासाठी TOR मंजूर झालेला आहे. याबाबतची पुढील कार्यवाही तातडीने पुर्ण करण्यात येत आहे.

पर्यावरण मान्यता प्राप्त होण्यासाठी आवश्यक असलेले EIA व EMP अभ्यास करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. पावसाळा व हिवाळा या दोन हंगामाचा अभ्यास पूर्ण झाला असून पावसाळा पूर्व हंगामाचा अभ्यास प्रगतीपथावर आहे. अभ्यास पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेमार्फत जनसुनावणी घेण्यात येणार आहे. जनसुनावणी झाल्यानंतर ऑगस्ट २०१७ मध्ये अंतिम पर्यावरण मान्यतेसाठी केंद्रीय वन, पर्यावरण व हवामान बदल विभाग (MoEF) नवी दिल्ली यांना प्रस्ताव सादर करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यात लोअरवणामध्ये असलेले पाणी खाजगी कंपनी बेकायदेशीरपणे वापरत असल्याबाबत**

**(३५) ८१४६७ (१७-०४-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यात लोअरवणामध्ये असलेले पाणी खाजगी कंपनी बेकायदेशीरपणे वापरत असूनही याकडे स्थानिक शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार बेकायदेशीरपणे पाणी वापर करणाऱ्या कंपन्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०७-२०१७) :** (१) नाही.

निम्न वेणा प्रकल्पातून २७.८६५ द.ल.घ.मी. पाणी घरगुती वापरासाठी व ८३.२०७ द.ल.घ.मी. पाणी औद्योगिक वापरासाठी (विविध खाजगी कंपनी करिता) असे एकूण १११.०७२ द.ल.घ.मी. पाणी आरक्षित आहे. पाण्याच्या आकारणीनुसार वसुली करण्यात येत आहे. लोअरवणा प्रकल्पातून खाजगी कंपनी बेकायदेशीरपणे पाणी वापर करीत नाही.

(२) प्रश्न उद्‍भवत नाही.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील सुर्या प्रकल्पाच्या वीज देयकाची थकबाकी जमा करण्याबाबत**

**(३६) ८१४८४ (१५-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील सुर्या प्रकल्पाची कोट्यवधी रुपयांची वीज देयकाची थकबाकी असल्याने महावितरण कंपनीकडून दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास वीज जोडणी खंडीत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर वीज देयकाची थकबाकी तात्काळ जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) सुर्या प्रकल्पांतर्गत धामणी मुख्य धरण, कवडास उन्नैयी बंधारा व सुर्यानगर वसाहतीची वीज जोडणी थकीत वीज देयकामुळे दिनांक २०/१/२०१७ पासून खंडीत करण्यात आली होती.

(२) व (३) सन २००२ ते आजतागायत थकित वीज देयकाची रक्कम निधी उपलब्धतेच्या अनुषंगाने धरणांची सुरक्षितता लक्षात घेऊन प्राधान्याने धामणी मुख्य धरण व कवडास उन्नैयी बंधाऱ्याची वीज देयके १००% अदा करण्यात आली आहेत. सुर्यानगर वसाहतीच्या थकित उर्वरित वीज देयकाची रक्कम निधी उपलब्धतेनुसार अदा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील टेमघर धरणाच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे धरणाची गळती होत असल्याबाबत**

**(३७) ८१५४२ (१५-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेमघर धरणाच्या बांधकामातील त्रुटीमुळे पाण्याची मोठ्या प्रमाणावर गळती होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाच्या दुरुस्तीसाठी ९८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून धरण दुरुस्तीची निविदा दोन वेळा काढून देखील फक्त दोनच ठेकेदारांनी याला प्रतिसाद दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धरणाच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१) होय.

(२) टेमघर प्रकल्पाच्या गळती प्रतिबंधक कामांसाठी रु.२०.०० कोटी इतका निधी सन २०१७-१८ साठी मंजूर आहे. टेमघर प्रकल्पाच्या गळती प्रतिबंधक कामासाठी दोनच ठेकेदारांनी प्रतिसाद दिला होता, हे खरे आहे.

(३) टेमघर धरणाच्या गळती दुरुस्तीसाठी एकूण ३ निविदा शासन स्तरावरुन स्वीकृत झालेल्या आहेत. त्याचे कार्यारंभ आदेश दि.२७/०२/२०१७ रोजी दिले असून प्रत्यक्ष कामास दि.२८/०२/२०१७ पासून सुरुवात झाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील टेंभू, ताकारी, म्हैसाळ आदि सिंचन योजनांच्या थकीत वीज देण्याबाबत**

**(३८) ८१६२० (१५-०४-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील टेंभू, ताकारी, म्हैसाळ आदी सिंचन योजनांचे सुमारे ४४.९७ कोटी रुपयांची वीज थकबाकी असल्याने सदर योजना सुरु करण्याबाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सिंचन योजनांची एवढ्या मोठ्या प्रमाणात वीज थकबाकी राहण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, थकीत बिल भरण्यासाठी विशेष तरतूद केली असल्याचे जाहीर केले परंतु प्रत्यक्षात तो निधी मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर योजनांची रू. ४०.२७ कोटी इतकी वीज देयकांची थकबाकी आहे.

(२) लाभधारकांकडून पाणीपट्टी वसूलीस अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने वीज देयकांची मोठ्या प्रमाणात थकबाकी रहात आहे.

(३) नाही.

महसूल व वन विभाग शासन निर्णय दि. २०/१०/२०१५ नुसार विद्युत देयकात टंचाई कालावधीत ३३.५०% सुट दिलेली आहे. सदर विशेष तरतुदी अंतर्गत माहे एप्रिल २०१६ ते जून २०१६ या कालावधीतील ३३.५% सवलतीचा निधी (रु.९.६१ कोटी) प्राप्त झालेला आहे. तसेच महावितरणने दि. १७/३/२०१७ अन्वये उपसा सिंचन योजनेच्या थकबाकीमध्ये असलेल्या ग्राहकांसाठी काही सवलती जाहीर केलेल्या आहे. त्याअतंर्गत महामंडळाने भांडवली जमेतून (स्वनिधी) थकीत वीजबिलापोटी टेंभू उपसा सिंचन योजनेसाठी रू. ९४५.१२ लक्ष व ताकारी उपसा सिंचन योजनेसाठी रु. ८६.१२ लक्ष इतका निधी उपलब्ध करून दिला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तिलारी धरण (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) परिसरातील बागबगीच्यांची झालेली दुरवस्था**

**(३९) ८१८११ (१५-०४-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिलारी धरण (ता. दोडामार्ग, जि सिंधुदुर्ग) परिसरातील बगीचाची देखभाल करण्याची जबाबदारी ठेकेदारावर देण्यात आली होती परंतु २ वर्षानंतर सदर बगीच्याची कोणत्याही प्रकारची देखभाल न केल्यामुळे त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच पाटबंधारे विभागाने या धरण क्षेत्रात पर्यटकांसाठी कोणत्या प्रकारच्या सोयी-सुविधा केल्या असून या सोयी-सुविधांसाठी सुमारे १ कोटी रुपये खर्च होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) तिलारी धरण परिसरातील बागेची मागील दोन वर्षापासून निधीच्या अनुपलब्धतेमुळे देखभाल करण्यात आलेली नव्हती. तथापि सद्य:स्थितीत बागेची देखभाल करण्यात येत आहे.
(२) सद्य:स्थितीत जलसंपदा विभागामार्फत तिलारी धरण परिसरात पर्यटकांसाठी प्रसाधनगृह व निवारा शेडची व्यवस्था केली आहे. सदर कामासाठी सुमारे रु. ११.५५ लक्ष इतका खर्च झालेला आहे. त्या व्यतिरिक्त पर्यटकांसाठी इतर सुविधा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत पुरविण्यात येणार आहेत.
(३) शासनाने सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला असून, तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्प हा सिंधुदुर्ग जिल्हयातील पर्यटनदृष्टया महत्वाचा व मोठा प्रकल्प आहे.
तिलारी प्रकल्प पर्यटन स्थळ म्हणून विकसित करणेबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्यासमवेत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**रिसोड व मालेगांव (जि.वाशिम) तालुक्यातील लघु पाटबंधारे योजनांना सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(४०) ८२११९ (२०-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील रिसोड व मालेगांव तालुक्यातील ल.पा.योजनांची किमंत शेतीच्या सरळ खरेदी प्रकरणामुळे वाढली असल्यामुळे या ल.पा.योजनांची कामे सुधारीत प्रशासकीय मान्यते अभावी बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाशिम जिल्हा मा.राज्यपालांनी निर्धारीत केलेल्या सिचनांच्या अनुशेषातंर्गतचा जिल्हा असुन या लघू पाटबंधारे योजनेमुळे सुमारे ३००० हेक्टर जमिन ओलीताखाली येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मालेगांव व रिसोड तालुक्यातील लघू पाटबंधारे योजनांना सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) नाही.
(२) वाशिम जिल्हयातील रिसोड तालुक्यात ६ प्रकल्प व मालेगांव तालुक्यात ७ प्रकल्प बांधकामाधीन असून या लघु पाटबंधारे प्रकल्पांमुळे एकुण ९१४४ हेक्टर जमिन ओलीताखाली येणार आहे.
(३) वाशिम जिल्हयातील रिसोड व मालेगांव तालुक्यातील कुकसा, पळसखेड, वाडीरायताळ, वाकद, मिर्झापूर व चाकतिर्थ या ६ प्रकल्पांना सुधारीत प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.
तसेच कोयाळी, मैराळडोह, खडकी व पांग्राबंदी हे ४ प्रकल्प सुधारित प्रशायकीय मान्यता(सु.प्र.मा.)च्या विविध टप्प्यात मान्यतेस्तव आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती विभागातील सिंचन अनुशेषाच्या परिगणनेसाठी समिती गठीत करणेबाबत**

**(४१) ८२६८६ (१७-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती विभागातील सिंचन अनुशेषाच्या परिगणनेसाठी समिती गठीत करणेबाबत लोकप्रतिनिधींनी (कारंजा) मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक १८ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०७-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) अमरावती विभागातील सिंचन अनुशेषाच्या परिगणनेसाठी समिती गठीत करावी किंवा कसे ही बाब शासनाच्या विचाराधीन असून त्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

---

**टाकळी कलान प्रकल्प (जि.अमरावती) येथील बांधकामाच्या प्रकल्प बाधित शेतकऱ्यांनी या प्रकल्पाचे बांधकाम न करण्याबाबत**

**(४२) ८२८०० (१५-०४-२०१७). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकळी कलान प्रकल्प (जि.अमरावती) येथील बांधकामाबाबत प्रकल्प बाधित शेतकऱ्यांनी या प्रकल्पाचे बांधकाम करू नये यासाठी जिल्हाधिकारी अमरावती व संबंधित लोकप्रतिनिधी यांचेकडे आंदोलन करुन बांधकाम थांबविण्यात यावे अशी तक्रार केली असल्याने मा.मुख्यमंत्री व संबंधित खात्याचे मंत्री यांनी चौकशीचे आदेश दिले असून काम थांबविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंत्राटदार व संबंधित कार्यकारी अभियंता यांचेवर कारवाई करून काम बंद करण्याचे आदेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदवले खुर्द (ता.माण, जि.सातारा) येथील माण नदीवर असलेल्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची झालेली दुरवस्था**

**(४३) ८२८४३ (१८-०४-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदवले खुर्द (ता.माण, जि.सातारा) येथील माण नदीवर असलेल्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचा पाया मोठया प्रमाणावर खचला असून त्यातील दगड निघाल्याने बंधाऱ्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने सदर बंधा-याचे निरिक्षण करुन त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०७-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे. गोंदवले खुर्द (ता.माण, जि.सातारा) येथील माण नदीवर असलेल्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या अधो बाजूकडील पायाचे Slab/Coping च्या खालील बाजूस झालेल्या Scouring मुळे काही दगड विस्कळीत झालेले आहेत व Coping अंधातरी झालेले आहे.

(२) सदर बंधाऱ्याचे रु. ३.८८ लक्ष खर्चाचे दुरुस्तीचे काम जलयुक्त शिवार अभियानांतर्गत प्रगतीत असून बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम जून २०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील जिहे-कठापूर योजना पूर्ण करण्याबाबत**

**(४४) ८३१५१ (१८-०४-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माण (जि.सातारा) तालुक्यातील उरमोडी धरणातील पाणी तीन ठिकाणी उचलून ११५ किलोमिटर वरुन कालव्याद्वारे माण तालुक्यात आणले असतानाही पूर्वेकडील अर्धा तालुका पाण्यापासून वंचित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिहे-कठापूर योजना तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१)सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील पूर्वेकडील सदरचे अंशत: क्षेत्र जिहे कटापूर उपसा सिंचन योजनेचा भाग आहे.
(२) सदर क्षेत्रास पाणी देण्याच्या दृष्टीने जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेचे काम प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातून जाणा-या मुख्य कालवा भरुन वाहत असल्यामुळे पिकांचे नुकसान झाल्याबाबत**

**(४५) ८३२३७ (२०-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातून जाणा-या मुख्य कालवा भरुन वाहत असल्यामुळे शेंदूरजनाबाजार येथील शेतक-यांचे शेकडो एकर चना, गहू पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याचे माहे नोव्हेंबर,२०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणी बंद करणे व सोडण्यासाठी यावर्षी उर्ध्व वर्धा प्रकल्पाचा कर्मचारी उपस्थित नसल्यामुळे कालवा भरुन वाहत असूनसुध्दा याकडे उर्ध्व वर्धा धरण विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे शेतक-यांच्या शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०७-२०१७) :** (१) नाही.

तिवसा तालुक्यातून जाणारा उजवा मुख्य कालवा ओव्हरफ्लो झालेला नाही. तिवसा तालुक्यातील डेहणी लघुकालव्याचा प्रवाह लाभक्षेत्रातील कास्तकाराने अनधिकृतपणे वाढविल्यामुळे कालव्यावरुन पाणी ओसंडून वाहीले होते. तथापि, संबंधित क्षेत्रिय कर्मचाऱ्याच्या ही बाब वेळीच लक्षात आल्यामुळे त्याने प्रवाह नियंत्रित केला व त्यामुळे हे पाणी पाटाचे हद्दीतून वाहत जाऊन लगतच्या नाल्यास मिळाले होते. कालव्याच्या ओव्हरफ्लो मुळे शेतीचे/पिकाचे नुकसान झालेले नाही.
(२) पाणी बंद करणे व सोडण्यासाठी कर्मचारी उपस्थित असल्यामुळेच कालव्याचा प्रवाह नियंत्रित करुन होणारे संभाव्य नुकसान टाळण्यात आले आहे.
(३) सदर कृती अज्ञात व्यक्ती व्दारे झाली असल्याने त्याचा शोध लागू शकला नाही. तथापि, याबाबत ग्रामपंचायतव्दारे मुनादी देऊन त्या परिसरातील लोकांना असे प्रकार यापुढे घडल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल असे अवगत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पोयनार लघुपाटबंधारे प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४६) ८३३६० (१८-०४-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पोयनार लघुपाटबंधारे प्रकल्पाचे सुमारे ३६ वर्षापासून सुरू असलेले काम व प्रकल्पामुळे विस्तापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत सुविधांची कामेही अद्याप अपूर्ण असल्याने ही सर्व कामे पूर्ण करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांकडून मागणी होत असून माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याने उपोषणाचा इशारा दिलेला होता, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार पोयनार लघुपाटबंधारे प्रकल्पाचे काम तात्काळ करण्यासह प्रकल्पग्रस्तांना मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०७-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

२८० बाधीत कुटुंबाचे पुनर्वसन धामणी माडांबा व फुरुससीमा या पुनर्वसित गावठाणात करण्यात आले आहे. देय नागरी सुविधापैकी मुख्य मुलभूत सुविधा पूर्ण असून उर्वरित नागरी कामे डिसेंबर, १७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. दि. २६.१.२०१७ रोजी नागरी सुविधा व अन्य कामाबाबत श्री.शेखर शाहू विचारे यांनी उपोषणाचा इशारा दिला होता.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रांगव येथील धरणाच्या दोन्ही कालव्यांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४७)** *८३३६८* **(१८-०४-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रांगव येथील धरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून अद्यापही दोन्ही कालव्यांची कामे अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरण परिसरांतील रिंगरोडची दुरवस्था असून लगतचे डोंगरही गेले दोन वर्षापासून खचलेले असून सदर ठिकाणी संरक्षण भिंती बांधण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपूर्ण कालवे, रिंगरोड व धोकादायक ठिकाणी संरक्षण भिंती बांधणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

रांगव प्रकल्प परिसरात दि. २३.९.२०१६ रोजी एका दिवसात २४७ मि.मी. पाऊस झाल्यामुळे सतत झालेल्या अतिवृष्टीमुळे धरण परिसरातील चौकीदार निवासस्थानाच्या पाठीमागून जाणाऱ्या रिंगरोडसाठी खोदाई करण्यात आलेल्या भागामध्ये डोंगर उतारावरील मऊ स्तराचा भाग दि. २३.९.२०१६ रोजी स्खलित झाल्याने स्थानिक लोकांच्या श्रमदानातून रिंगरोडवर पडलेले दगड व मातील रस्त्याच्या बाजूला करुन रिंगरोड पूर्ववत सुरु करण्यात आला आहे. तसेच धरणाच्या दोन्ही बाजू लगत असणारे डोंगर खचले नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परांडा (जि.उस्मानाबाद) येथे कृष्णा मराठवाडा सिंचन योजनेतंर्गत संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(४८) ८३४७० (१८-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा मराठवाडा सिंचन (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) योजनेअंतर्गत कॅनॉलसाठी शेतकऱ्यांच्या मोठया प्रमाणावर जमिनी संपादित केल्या होत्या त्या संपादित जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना तात्काळ देण्यात यावा याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शेतकऱ्यांना संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अद्यापपर्यत दिलेला नसून सदरील योजना ही सद्य:स्थितीत बंद आहे तसेच संपादित केलेल्या जमिनीमध्ये कॅनॉलचे खड्डे असल्याने शेतकऱ्यांना त्यात उत्पन्नही घेता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शेतकऱ्यांना संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१) होय.

श्री.राहुल म. मोटे, वि.स.स., यांनी दिनांक २०/२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले आहे.

(२) व (३) कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना १ टप्पा क्र.३ अ/ब अंतर्गत परंडा / भुम तालुक्यातील कालव्याचे कामे प्रगतीपथावर असून, सदरील कामे ही पूर्णत्वाकडे आहेत. या कालवा कामासाठी संपादीत करावयाचे क्षेत्राचे भूसंपादन प्रस्ताव जुन्या भूसंपादन कायद्यान्वये सन २०१०-११ मध्ये कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग उस्मानाबाद, यांचेमार्फत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना सादर करण्यात आले होते. यातील बहुतांश प्रस्तावांची संयुक्त मोजणी पूर्ण होऊन जुन्या कायद्याप्रमाणे कलम ४ (१) ची अधिसूचना प्रसिध्द झालेली आहे. दरम्यान सन २०१३ मध्ये नविन भूसंपादन कायदा अस्तित्वात आल्याने सर्व प्रकरणे व्यपगत झालेली आहेत. आता नविन कायद्याप्रमाणे ३० भूसंपादन प्रकरणे जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, यांना सादर करण्यात आली आहेत. यापैकी १३भूसंपादन प्रकरणात कलम ११ ची कार्यवाही झालेली आहे. उर्वरित प्रस्तावात कलम ११ ची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या प्रकरणात भूसंपादन कायद्याप्रमाणे कलम ११ पूर्वी भरावयाच्या मावेजापोटी रु.७.४९ कोटी एवढा निधी संबंधीत उपजिल्हाधिकारी, भूसंपादन यांचेकडे उपलब्ध करण्यात आला आहे. सदरहू प्रकरणे लवकरात लवकर अंतिम करुन संबंधीतांना मावेजा वाटप करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे डोमगाव (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) येथील सीना कोळेगाव धरणातील कालव्याची कामे पूर्ण करण्यासह उपसा सिंचन योजनेमधील पंपहाऊस मशिनची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४९) ८३५१४ (२०-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोमगाव (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) येथील सीना कोळेगाव धरणातील कालव्याची कामे पूर्ण करण्याची तसेच उपसा सिंचन योजनेमधील पंपहाऊस मशिनची दुरुस्ती करण्याची मागणी मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २० फेब्रुवारी,२०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार कोळेगाव कालव्याचे काम पूर्ण करण्यासह उपसा सिंचन योजनेमधील पंपहाऊस मशिनची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) होय.

(२) सिना कोळेगाव प्रकल्पावरील परांडा उपसा सिंचन योजनेवरील कंडारी शाखा कालवा व मुगाव शाखा कालव्याची कामे १०० % पूर्ण आहेत.

सद्यस्थितीत परांडा उपसा सिंचन योजनेवरील पंपगृहाच्या दुरुस्तीचे काम यांत्रिकी विभाग व जलविद्युत विभागामार्फत प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा (जि.जळगाव) तालुक्यातील हिवरा मध्यम प्रकल्पाचे पाणी वाया जात असल्याबाबत**

**(५०) ८३७९७ (१८-०४-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगाव) तालुक्यातील हिवरा मध्यम प्रकल्पाच्या उजव्या कालव्याद्वारे रब्बी पिकासाठी आवर्तन सोडण्यात आले मात्र पाटचारीद्वारे पाणी रस्त्यालगत येऊन मोठया खदानी व खड्डे तुडुंब भरले असल्यामुळे लाखो लिटर पाणी वाया जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाकडे अधिकारी व कर्मचारी वर्गाचे दुर्लक्ष असल्याने या प्रकरणाची चौकशीची मागणी स्थानिक शेतक-यांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०७-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

मुख्य कालवा बऱ्याच ठिकाणी भरावामध्ये असल्यामुळे काही प्रमाणात पाण्याचा पाझर होतो, तथापि मोठया प्रमाणावर पाणी वाया जाते, हे खरे नाही.

(२) नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.